**NASHIK MUNICIPAL CORPORATION**
PROPERTY TAX DEPARTMENT

EXPRESSION OF INTEREST FOR LEASE OF TRANSMISSION TOWERS AND TRANSMISSION RECEIVING STATIONS FOR INSTALLATION OF TELECOM EQUIPMENTS

Expression of interest (EOI) is invited for the Lease of transmission towers and transmission receiving stations for installation of telecom equipments on Nashik Municipal Corporation Land (vested with Nashik Municipal Corporation). The service providers are requested to go through the detail EOI form published on web site **www.nmc.gov.in** stating submission procedure, brief scope of work, prequalification condition etc. This notice is available on web site free of cost from Dt. 22/02/2024 The interested service providers are requested to submit their EOI proposal as prescribed in Detail EOI form published on website on or before dt. 28/02/2024 till 15.00 hrs. in the office of Dy. Municipal Commissiner (Tax) Property Tax Department, Ground Floor, Rajiv Gandhi Bhavan, Sharnpur Road, Nashik.

Sd/xxx
Dy. Commssioner (Tax)
Nashik Municipal Corporation, Nashik

# नाशिक महानगरपालिका नाशिक

## कर आकारणी विभाग

(Expression of Interest) EOI

**विषय** : नाशिक महानगरपालिकेच्या मालकीच्या जमिनी/ इमारतींवर मोबाईल मनोरा उभारणीकामी भाडेतत्वावर जागा देणेकामी इच्छुक मोबाईल कंपण्यांकडून प्रस्ताव मागवीणेत येत आहे.

शासन निर्णय क्र. मा.त.स.०६५/प्र.क्र.१/२०१८ व शासनाच्या मार्गदर्शन सुचना, शासन निर्णय संकिर्ण-२०२१/C.R. २४२/UD-२० दि. १९ डिसेंबर २०२२ अन्वये, शासनाने दुरसंचार पायाभुत सुविधा धोरण निर्गमित केले असून, त्यामध्ये स्थानिक संस्थांच्या मालकीच्या जागांवर मोबाईल टॉवर उभारणेची अनुज्ञेय करण्यात आले आहे. त्यानुसार मोबाईल नेटवर्क प्रदाता/दूरसंचार ऑपरेटर व इतर कंपनी यांना स्वत:चे दुरसंचार नेटवर्क असणे आणि वैध दुरसंचार परवाना/ परवानगी असणे/ संबंधीत परवाना प्राधिकरणाकडून परिशिष्ट-अ मध्ये नमुद केलेल्या, नाशिक महानगरपालिकेच्या मालकीच्या जागा/इमारतींवर मोबाईल मनोरा उभारणीकामी भाडेतत्वावर जागा देणेकामी प्रस्ताव खालील अटी-शर्तीस अधिनराहुन इच्छुक कंपण्यांकडुन प्रस्ताव मागणीवेत येत आहे.

### अटी-शर्ती

१) मोबाईल कंपण्या त्यांचे नेटवर्क नुसार, जागा निश्चित करुन त्याचा अहवाल महापालिकेस सादर केल्यानंतर, भाडे रक्कम निश्चित करतांना, प्रचलित शिघ्र सिध्द गणकानुसार (Ready Reckoner Rate) जमिनीच्या ८ टक्के प्रतिवर्ष या प्रमाणे येणारे भाडे किंवा रू. १२,०००/- (१ ते १०० चौ.फुट करिता) यापैकी जे जास्त असेल त्या प्रमाणे भाड्याची रक्कम आकारणी करण्यास तसेच प्रति बुस्टरसाठी प्रती माह रू. ४५००/- प्रमाणे भाड्याची रक्कम आकारणेत येईल.

३) मोबाईल मनोरा कंपनीने निश्चित केलेले प्रति मासिक भाडेच्या तिन महिन्याचे भाडे सुरक्षा अनामत रक्कम म्हणुन भरणा करणे अनिवार्य आहे.

४) मोबाईल मनोरा उभारणीसाठी जास्तीत जास्त अनुज्ञेय क्षेत्र १ ते १०० चौ.फुट पेक्षा जास्त नसावे. त्यापेक्षा जास्त क्षेत्राची आवश्यकता असल्यास, मुद्दा क्र. २ मध्ये नमुद दर प्रमाणे अतिरिक्त भाडे आकारणेत येईल.

५) मोबाईल मनोरा उभारणेकरीता परवानगी ५ वर्ष वैध असेल मात्र दर वर्षी मासिक भाडे रक्केमध्ये १० टक्के दराने दरवाढ करण्यात येईल. वैध कालावधी संपण्याच्या एक महिना अगोदर कंपनीने रीतसर अर्ज सादर करुन नुतनीकरण करून घेणे गरजेचे राहील.

६) महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियमातील तरतुदींमध्ये मोबाईल टॉवर उभारण्याकरिता प्राप्त अर्जान्वये दाखल होणाऱ्या प्रस्तावास, नगररचना विभागाच्या नियमानुसार आवश्यक असणाऱ्या शुल्क भरणा करून, नियमित तरतुदींनुसार देय असणाऱ्या मोबाईल टॉवर महानगरपालिकेच्या मिळकतींवर भाडे आकारणी वरील प्रमाणे देय असेल.

७) आरक्षित जागेच्या एका कोपऱ्यात असेल, या अटींच्या अधीन राहून.

८) मोबाईल मनोरा उभारणी करण्यासाठी एका एजन्सीस जागा उपलब्ध करुन दिल्यानंतर, सदर ठिकाणी इतर एजन्सीने मोबाईल मनोरा उभारणी करणेकामी मागणी केल्यास, जागा उपलब्धते नुसार परवानगी देण्यात येईल.

९) एकाच जागा/इमारतीवर दोन स्वतंत्र मोबाईल मनोरा उभारणी करण्यासाठी मागणी असल्यास, जो जास्तीत जास्त भाडे देईल त्यास प्रथम प्राधान्य देण्यात येईल.

१०) मोबाईल मनोरा व कॅबीन ज्या उद्देशासाठी परवानगी देण्यात येईल, त्याच उद्देशाकरीता वापर करणे अनिवार्य आहे.

११) मोबाईल मनोराच्या ठिकाणी कोणत्याही कारणास्तव जिवीत अथवा वित्तहानी झाल्यास, त्याची सर्वस्वी जबाबदारी कंपनीची राहील. महानगरपालिका याबाबत कोणतीही नुकसान भरपाई देणार नाही.

१२) मोबाईल मनोरा संरचनेचे स्थिरता (Structure Stability Certificate) प्रमाणपत्र घेणे बंधनकारक राहील.

१३) मोबाईल मनोरा उभारणेकरीता लागणा-या वाहतुक पोलीस विभागाची व इतर शासकीय विभागाच्या परवानग्या घेण्याची जबाबदारी कंपनीची आहे.

१४) मोबाईल मनोरा असलेल्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे / विद्युत जोडणी करणे व बिल अदा करणे इतर सुविधा करण्याची संपुर्ण जबाबदारी संबंधीत कंपनीची राहील.

१५) सबळ कारणास्तव मोबाईल मनोरा कंपनीस दिलेली परवानगी कोणत्याही क्षणी रद्द करण्याचे अधिकार मा. आयुक्त सो. यांचे राहतील.

१६) भविष्यात नैसर्गिक आपत्तीमुळे मोबाईल मनोराचे नुकसान होऊन कोणत्याही प्रकारची हानी झाल्यास, त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत कंपनीची राहील.

१७) मोबाईल मनोराकरीता लागणारा विद्युतपुरवठा हा महापालिकेच्या पोलवरून न घेता महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं. मर्या यांच्याकडून प्राप्त करणे बंधनकारक राहील.

१८) मोबाईल मनोरा उभारताना सदर जागी कोणतीही झाडे तोडता येणार नाही किंवा झाडाच्या फांद्या छाटता येणार नाही. विस्तार कमी करणेसाठी रितसर मनपाचे वृक्ष व प्राधिकरण विभागाची परवानगी घेणे अनिवार्य राहील.

१९) मोबाईल मनोराच्या आजुबाजुला सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यकते नुसार कुंपन घालणे बंधनकारक राहील.

२०) मोबाईल मनोरामुळे आसपासच्या नागरीकांना त्रास/गैरसोय / मार्गात अडथळा निर्माण होणार नाही याची खबरदारी घेण्याची जबाबदारी कंपनीची राहील.

२१) मोबाईल मनोरा उभारण्याच्या वेळी लागणाऱ्या पाण्याची व बांधकाम साहित्याची व्यवस्था कंपनीने करावी. महापालिकेच्या पाण्याचा वापर करता येणार नाही.

२२) मोबाईल मनोरा उभारतांना निर्माण होणारा मलबा रस्त्यावर/ फुटपाथवर पडून नागरीकांना त्रास होणार नाही याची काळजी घ्यावी लागेल.

२३) मोबाईल मनोराच्या ठिकाणी पाणी साचुन मलेरीया, डेंग्यु सारखे रोग पसरणार नाही याची दक्षता घ्यावी व नियमितपणे निर्जंतुकीकरण करण्याची जबाबदारी संबंधित कंपनीची राहील.

२४) मनोरा बांधकाम करण्यासाठी रस्ते खोदकाम करावयाचे असल्यास, मनपाच्या सार्व. बांधकाम विभागाची परवानगी घेणे बंधनकारक राहील.

२५) परिसरातील नागरिकांच्या रेडिएशन संबंधित तक्रारी निवारण्याची जबाबदारी संबंधीत कंपनीची राहील.

२६) मोबाईल मनोरा उभारणी करण्यासाठी आवश्यक ती परवानगी नगररचना विभागाकडुन घेणे बंधनकारक राहील.

२७) मोबाईल मनोरा उभारणी केल्यानंतर, मोबाईल मनोराचे मालमत्ता कर स्वतंत्र आकारणी व तो नियमाप्रमाणे संबंधीत मोबाईल कंपनीने भरणा करणे अनिवार्य राहील.

२८) महानगरपालिकेच्या मिळकतींवर मोबाईल मनोरा उभारणी करावयाचा असल्यास, इमारतींच्या बांधकामास बाधा येणार नाही किंवा नुकसान होणार नाही याची दक्षता संबंधीत मोबाईल कंपनीने घेणे अनिवार्य आहे. तसेच मनपाने निर्देशित केलेनुसार सदर इमरतीचे स्ट्रक्चरल ऑडीत संबंधीत कंपनीस स्वखर्चने करुन दयावे लागेल.

२९) Standing Advisory Committee for Frequency Allocation SACFA तसेच TERM- Cell चे प्रमाणपत्र संबंधित कंपनीने सादर करणे अनिवार्य राहील.

३०) उभारणी केलेल्या मोबाईल मनोरा वर कोणत्याही प्रकारची जाहिरात प्रदर्शित करणे, विना परवानगी पोट भाडेकरु ठेवणे वा अन्य उत्पन्न मिळविणे या बाबी करता येणार नाही.

३१) वेळोवेळी शासन/महापालिकेने परित केलेले नियम, स्थायी आदेश, निर्देश इ. संबंधीत कंपनीस लागु रहातील.

Sd/xxx

उप आयुक्त (कर)

नाशिक महानगरपालिका, नाशिक

परिशिष्ट - अ

**नाशिक महानगरपालिका, नाशिक**

मोबाईल मनोरा उभारणीसाठी निश्चित केलेल्या मनपा मालकीच्या जागाची यादी

| अ.न. | विभाग | निश्चित केलेल्या जागा / इमारतीचे नांव व पत्ता |
|---|---|---|
| १ | नाशिक पुर्व | पाथर्डीरोड सदिच्छानगर, इंदिरानगर नाशिक |
| २ | नाशिक पुर्व | साक्षात्कारी दत मंदीर मार्ग एल आय सी कॉलनी |
| ३ | नाशिक पुर्व | पांडव नगरी इंदीरानगर नाशिक |
| ४ | नाशिक पुर्व | सिटटी गार्डन स्टेट बॅक कॉलनी इंदिरानगर नाशिक |
| ५ | नाशिक पश्चिम | डी.के.नगर येथील उद्यान डि.के.नगर गंगापुर रोड नाशिक. |
| ६ | पंचवटी | आयोध्या नगरी श्रध्देय पंडीत दीन दयाळ उपाध्याय उद्यान |
| ७ | पंचवटी | सरस्वती नगर उद्यान के.के.वाघ ॲग्रीकलचर कॉलेज |
| ८ | पंचवटी | रेणुका अर्पा उद्यान अमृतधाम |
| ९ | पंचवटी | वॅसप्राइड अर्पा राजगृह बंगला समोर अमृतधाम. |
| १० | पंचवटी | स्वामी समर्थ नगर उद्यान,वृंदावन नगर |
| ११ | पंचवटी | हनुमान नगर तुळसाई उद्यान |
| १२ | नाशिक रोड | निसर्गोपचार केंद्रालगत असलेल्या मनपा नर्सरीमधील जागा,जयभवानी रोड,ना. रोड. |
| १३ | नविन | बाल मुक्तांगण इंग्लिश मिडीयम स्कुल,वृंदावन नगर |
| १४ | नविन | इंद्रा नगर उद्यान सायखेडकर हॉस्पीटल मागे,नविन नाशिक. |
| १५ | सातपूर. | जिजामाता शाळा जवळ,सातपूर कॉलनी,सातपुर |
| १६ | नाशिक रोड | देवळाली गांव मालधक्कारोड सुलभ शैचालय,राजवाडा नाशिकरोड |
| १७ | नाशिक रोड | घाडगे मळा अभ्यासिका,तरणतलाव जवळ,नाशिक रोड. |
| १८ | नाशिक रोड | अंबा समाज मंदिर, शिखरेवाडी, नाशिक रोड. |
| १९ | नाशिक रोड | गोसाविनगर,प्र.क्र.१७ मनपा अभ्यासिके समोरील खुल्या जागेत. |
| २० | नाशिक रोड | मपा पंचक हॉस्पिटल येथील खुल्या जागेत. |
| २१ | पंचवटी | तुळजाभवानी अभ्यासिका व महीला सभागृह मखमलाबाद शिवार |
| २२ | पंचवटी | शिवकृपा नगर सभागृह हिरावाडी |
| २३ | नविन | अंबिका नगर,केवल पार्क,नविन नाशिक,नाशिक. |
| २४ | नविन | सदिच्छा नगर, संदर्शन मंगल कार्यालय मागे, नविन नाशिक. |
| २५ | नविन | साईपॅलेस हॉटेल मागे,राणे नगर, नविन नाशिक. |
| २६ | नाशिक पुर्व | इंदिरानगर जॉगिंग ट्रक बोगदया जवळ. नाशिक |
| २७ | नाशिक पुर्व | रथच्रक्र हाऊसिंग सोसायटी,जवळ इंदिरानगर. नाशिक |
| २८ | नाशिक पुर्व | समता नगर नाशिक |
| २९ | नाशिक पश्चिम | समर्थ जॉगिंग ट्रॅक, आकाशवाणी टॉवर भाजी मार्केट जवळ गंगापुर रोड नाशिक. |
| ३० | नाशिक पश्चिम | गितांजली सोसा हॉल गितांजली सोसा विद्या विकास सर्कल,गंगापुर रोड नाशिक. |
| ३१ | पंचवटी | तलाठी कॉलणी पाण्याची टाकी. |
| ३२ | नविन | ज्ञानेश्वर नगर,पाण्याच्या टाकी जवळ,नविन नाशिक. |
| ३३ | नविन | चुंचाळे घरकल योजना, लाईन नं. २ बिल्डींग नं. १४ अंबड, |
| ३४ | सातपूर. | सिरीन मिडोस पाण्याची टाकी,गंगापूर रोड. |
| ३५ | सातपूर. | खंदवे नगर पाण्याची टाकी केनल रोड |

दि.   /   /

प्रति,
मा. आयुक्त सो,
नाशिक महानगरपालिका, नाशिक

विषय : नाशिक महानगरपालिकेच्या मालकीच्या जमिनी/ इमारतींवर मनोरा उभारणीकामी भाडेतत्वावर जागा उपलब्ध करुन देणे बाबत.

महोदय,

उपरोक्त विषयान्वये नाशिक महानगरपालिकेच्या मालकीच्या जमिनी/ इमारतींवर मनोरा उभारणीकामी खालील नमुद जागा भाडेतत्वावर नाशिक मनपाच्या अटी-शर्तीनुसार घेणेस इच्छुक आहे.

| अ.न. | विभाग | मोबाईल उभारणीकामी आवश्यक असलेलेल्या जागा |
|---|---|---|
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |

सिल व स्वाक्षरी